सेवानिवृत्तिवेतनाची प्रकरणे
वेळेवर सादर होण्यासंदर्भात..

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
शासन परिपत्रक-पीईएन-२००६/(२४८/०६)/माशि-६
मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ५ ऑक्टोबर, २००६.

वाचा :- १) शासन निर्णय,शालेय शिक्षण विभाग, क्रमांक-पीईएन-१००१/(१२२/०१)/माशि-६,दिनांक १६ जानेवारी,२००२ व दिनांक २१ फेब्रुवारी,२००२ चे शुध्दीपत्रक.
२) शासन परिपत्रक, शालेय शिक्षण विभाग,क्रमांक-पीईएन-१००१/१२२/२००१/माशि-६, दिनांक १९ जून,२००३.
३) शासन परिपत्रक, वित्त विभाग,क्रमांक-सेनिवे-१००५/५/सेवा-४, दिनांक २० ऑक्टोबर,२००५.

प्रस्तावना :- महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील नियम १२३ नुसार नियत वयोमानानुसार निवृत्त होणा-या कर्मचा-यांची निवृत्ती वेतन प्रकरणे ६ महिन्यापूर्वी महालेखाकार कार्यालयाकडे पाठविणे आवश्यक आहे. तथापि, शालेय शिक्षण विभागांतर्गत क्षेत्रिय कार्यालयांकडून शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यांची सेवानिवृत्तिवेतन प्रकरणे विहित कालावधीत महालेखाकार कार्यालयाकडे सादर होत नाहीत, अशी वस्तुस्थिती महालेखाकार (ले व ह ) I महाराष्ट्र, मुंबई यांनी दिनांक १२ सप्टेंबर,२००६ रोजीच्या अर्ध शासकीय पत्राव्दारे शासनाच्या निदर्शनास आणली आहे. त्याव्दारे असेही स्पष्ट करण्यात आले आहे की, एप्रिल ते ऑगस्ट,२००६ या कालावधीतील महालेखाकार यांना सादर झालेल्या प्रकरणांपैकी सुमारे ३० टक्के प्रकरणे विहित कालावधीत नव्हेतर संबंधित कर्मचा-यांच्या निवृत्तीपर्यंत देखील सादर झालेली नाहीत. ही बाब विभागाच्या दृष्टीने निश्चितच भूषणावह नाही, ही वस्तुस्थिती पाहता, पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत :-

# परिपत्रक

शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यांची सेवानिवृत्तिवेतन विषयक प्रकरणे सादर करण्यासंदर्भात अधिकाराचे विकेंद्रीकरण उपरोक्त शासन निर्णय, दिनांक १६ जानेवारी,२००२ अन्वये करण्यात आले आहे. त्यानुसार प्राथमिक/माध्यमिक कर्मचा-यांच्या सेवानिवृत्ती वेतनाची प्रकरणे सादर करण्याकरिता शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक),व शिक्षण निरीक्षक (उत्तर/दक्षिण/पश्चिम) बृहन्मुंबई यांना कार्यालय प्रमुख जाहीर केले असून, उच्च माध्यमिक/कनिष्ठ महाविद्यालयीन कर्मचा-यांच्या बाबतीत विभागीय शिक्षण उपसंचालक यांना कार्यालय प्रमुख म्हणून जाहीर करण्यात आलेले आहे. सदर शासन निर्णयाच्या परिच्छेद-२ नुसार टप्पा निहाय कार्यवाही विहित करण्यात आली आहे. त्यामध्ये प्रामुख्याने नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीच्या दिनांकापूर्वी सुमारे २ वर्ष अगोदरपासून सेवानिवृत्तीची कार्यवाही सुरु करुन, सेवानिवृत्तीच्या दिनांकापूर्वी ६ महिने अगोदर कागदपत्रे/प्रस्ताव महालेखाकारांकडे सादर करण्याची स्पष्ट तरतूद करण्यात आली आहे. तसेच संस्थांकडून मुख्याध्यापक/प्राचार्य यांच्यामार्फत कागदपत्रे ही कार्यालय प्रमुख म्हणून शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक)/ शिक्षण निरीक्षक (उत्तर/दक्षिण/पश्चिम) बृहन्मुंबई/विभागीय शिक्षण उपसंचालक यांचेकडे जात असल्यामुळे, अधिक विलंब लागू नये, यादृष्टीने मुख्याध्यापक/प्राचार्य यांच्याकडून शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), शिक्षण निरीक्षक (उत्तर/दक्षिण/पश्चिम), बृहन्मुंबई व विभागीय शिक्षण उपसंचालक यांचेकडे कागदपत्रे सादर करण्याकरिता ८ महिन्यांपूर्वीची मुदत दिलेली आहे. असे असून देखील या कार्यपध्दतीचे काटेकोरपणे पालन होताना दिसत नाही.

१. यासंदर्भात पुन्हा सर्व कार्यालय प्रमुखांना सूचना देण्यात येत आहेत की, विहित कार्यपध्दतीचे काटेकोरपणे पालन होत आहे, हे पाहणे आपले कर्तव्य आहे. अन्यथा भविष्यात सेवानिवृत्तिवेतन विषयक प्रकरणे महालेखाकारांकडे उशीरा सादर झाल्याचे निदर्शनास आल्यास, संबंधित कार्यालय प्रमुखांना व्यक्तिश: जबाबदार धरण्यात येईल. तसेच सेवानिवृत्ती प्रस्ताव विहित कालावधीत सादर न होण्यास संस्था अथवा मुख्याध्यापक/प्राचार्य जबाबदार

असतील तर त्यांच्यावर कारवाई करण्याची तरतूद उपरोक्त शासन परिपत्रक, दिनांक १९ जून,२००३ अन्वये करण्यात आली आहे. त्यानुसार संबंधितांवर कारवाई करण्यात येईल. थोडक्यात, शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यांचे सेवानिवृत्ती विषयक प्रस्ताव विहित कालावधीत महालेखाकारांकडे जाण्याकरिता सर्व संबंधितांनी दक्षता घेणे आवश्यक आहे.

३. उपरोक्त प्रमाणे विहित कालावधीमध्ये सेवानिवृत्तिवेतन प्रकरणे कार्यालय प्रमुखांकडून महालेखाकारांना विहित वेळेत सादर होत आहेत की नाहीत हे पाहण्याची जबाबदारी याव्दारे शिक्षण संचालक (प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक),महाराष्ट्र राज्य,पुणे यांचेवर सोपविण्यात येत आहे. तरी प्रत्येक महिन्यामध्ये महालेखाकारांकडे सादर केलेल्या प्रकरणांचा तपशील प्रत्येक कार्यालय प्रमुखाने संबंधित शिक्षण संचालकांकडे पुढील महिन्याच्या १५ तारखेपर्यंत सादर करणे बंधनकारक करण्यात येत आहे. असे करताना शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), शिक्षण निरीक्षक (उत्तर/दक्षिण/पश्चिम),बृहन्मुंबई हे सेवानिवृत्तिवेतन विषयक प्रकरणाकरिता कार्यालय प्रमुख असल्यामुळे त्यांनी असा तपशील विभागीय शिक्षण उपसंचालकांमार्फत सादर करण्याची आवश्यकता नाही. तपशीलामध्ये कार्यालय प्रमुखांनी महालेखाकारांकडे सादर केलेल्या प्रकरणातील कर्मचा-याचे नाव, संस्था, सेवानिवृत्तीचा दिनांक, प्रस्ताव महालेखाकारांकडे सादर केल्याचा दिनांक इत्यादी तपशील असावा. आवश्यकतेनुसार संचालक "प्रपत्र" विहित करतील. तोपर्यंत किमान वरीलप्रमाणे तपशील सर्व कार्यालय प्रमुखांनी संबंधित संचालकांकडे सादर करणे आवश्यक आहे.

४. सर्व कार्यालय प्रमखांकडून आलेल्या तपशीलाची छाननी शिक्षण संचालक (प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक),महाराष्ट्र राज्य,पुणे यांनी पुढील महिन्याच्या अखेरपर्यंत करुन, त्यापैकी ज्या प्रकरणांना विलंब झाला असेल, त्याबाबतीत संबंधित कार्यालय प्रमुखांचा खुलासा घ्यावा आणि आवश्यक तर संबंधितांविरुध्द कार्यवाहीचा प्रस्ताव शासनास सादर करावा. या संदर्भात वित्त विभाग, परिपत्रक क्रमांक-सेनिवे-१००५/५/सेवा-४, दिनांक

२० ऑक्टोबर,२००५ मधील परिच्छेद-६ कडे सर्व संबंधितांचे लक्ष वेधण्यात येत आहे. सदरहू परिच्छेद पुढीलप्रमाणे आहे :-

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ च्या नियम ११८ ते १२५ च्या तरतुदींचे काटेकोरपणे पालन न केल्यामुळे विलंब झाल्याचे निदर्शनास आले तर विलंबास जबाबदार असणारे संबंधित अधिकारी/विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांचेविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी. तसेच त्यांच्या गोपनीय अहवालात "निवृत्तीवेतनाची प्रकरणे निकालात काढण्यास अक्षम्य दिरंगाई झाल्याने व्याजापोटी शासनास आर्थिक झळ बसण्यास जबाबदार आहेत" अशा प्रकारची नोंद घेण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

माधुरी कोकणे

( माधुरी कोकणे )
सहसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य,पुणे.
शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य,पुणे.
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक)
शिक्षण निरीक्षक (उत्तर/दक्षिण/पश्चिम),बृहन्मुंबई
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय,मुंबई
नगर विकास विभाग,मंत्रालय,मुंबई
वित्त विभाग,(सेवा-४), मंत्रालय,मुंबई.
महालेखाकार (लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
महालेखाकार (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
सहसचिव/उपसचिव,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
सर्व कार्यासने, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय,मुंबई.